# माय निर्माण स्टोरी - मंदार देशपांडे



# शेती व ग्रामोद्योग आधारित जीवनशैलीच्या दिशेने...

शेतमालाला भाव नाही, वाढणारी महागाई, शेतकरी आत्महत्या, अवकाळी पाऊस तर कधी दुष्काळ अशा एक ना अनेक समस्यांना शेतकरीवर्गाला तोंड द्यावे लागते. यावर्षीच्या अर्थसंकल्पातही सरकारने कृषीविषयक अनेक योजना जाहीर केल्या आहेत. परंतु शेतमालाचा भाव, महागाई किंवा बजेट यांसारख्या गोष्टींची फारशी तमा न बाळगता एक तरुण आणि त्याचा परिवार वाटचाल करत आहेत शेती आणि ग्रामोद्योग आधारित जीवनशैलीच्या आणि स्वावलंबनाच्या दिशेने. त्याच्या आत्तापर्यंतच्या प्रवासाविषयी...

वय वर्ष ३०. या तरुण इंजिनीअर शेतकऱ्याचे नाव आहे मंदार देशपांडे. वर्धा जिल्ह्यातील आमगाव या गावी मंदार आणि त्याचं कुटुंब गेली अडीच वर्षं शेतीआधारित आणि पर्यावरणस्नेही जीवन जगत आहेत. मंदार मूळचा बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथचा. वडिलांची नोकरी लातूर येथे असल्याने मंदारचे अभियांत्रिकीपर्यंतचे शिक्षण लातूर येथे झाले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर काय, असा प्रश्न मंदारसमोर पडला होता. पण नोकरी करायची नाही, हे बऱ्यापैकी ठरले होते. कारण या चक्रात अडकणे मंदारला मान्य नव्हते आणि ते त्याच्या स्वभावालाही न पटणारे होते. शिक्षण पूर्ण होईपर्यंत घरात चालू असणाऱ्या चर्चा आणि विचारांचा प्रभाव मंदारवर पडत होता आणि त्यातूनच शेती करण्याचा धाडसी निर्णय घेण्यात आला आणि मंदारच्या या निर्णयाला त्याच्या कुटुंबाकडून पूर्ण पाठिंबा होता.



वडिलांच्या पाठिंब्यामुळेच आपण या दिशेने वाटचाल करत असल्याचे मंदार नमूद करतो. साधारण १९८५-१९९० च्या काळात जेव्हा आपल्या देशात संगणकीकरणाचा विचार सुरू होता, तेव्हा याबाबतीत विचार करताना मंदारच्या वडिलांना असे लक्षात आले की, पुढील काळात सर्वांना नोकरी मिळणे कठीण तर होईलच, पण त्याचबरोबर शहरातील नोकरीचे जीवन अधिक ताणतणावाचे होईल. परंतु एकट्याने विचार करण्यापेक्षा अनेकांनी मिळून केलेला विचार अनेक पैलूंना समोर आणत असतो आणि या विचारातूनच स्थापना झाली 'सन्मित्र मित्र मंडळाची'. विचारांना प्रामुख्याने स्थान असल्याने या मंडळात विविध जातीय, धर्म, पंथ, क्षेत्रांतील लोकांचा सहभाग होता. सर्वांना एकत्र मिळून पुढे जाता यावे, याकरता मंडळाच्या बैठकीनंतर बैठकीत झालेला विचार घरच्यांसमोर मांडणे आवश्यक असायचे. आणि अशातच मंदारच्या वडिलांनी घरात एक क्रांतिकारी विचार मांडला. तो म्हणजे, मंदारने दहावीनंतर प्रचलित शिक्षण सोडून द्यावे आणि उद्योग करावा. परंतु मंदारला हे पटले नाही आणि त्याने पुढे शिकण्याचा निर्णय घेतला. बारावीत चांगले मार्क्स मिळाल्याने त्याने अभियांत्रिकीला प्रवेश घेतला. परंतु शिक्षण सुरू असताना सन्मित्र आणि आणखी काही व्यक्तींच्या विचारांचा मंदारवर प्रभाव पडत होता.

याचदरम्यान, पर्यावरणीय जीवनशैलीचे अभ्यासक दिलीप कुलकर्णी यांचे काही विचार आणि पुस्तके त्याच्या वाचनात आली आणि त्यातूनच सध्याच्या उपभोगवादी जीवनशैलीचे पर्यावरणीय दुष्परिणाम, मानवी आरोग्यावरील शारीरिक-मानसिक परिणाम आणि एकंदरीतच सृष्टीचे बिघडणारे चक्र व त्यातील आपला सहभाग हे समजले. स्वतःच्या गरजा कमी करणे आणि मूलभूत गरजा म्हणजेच अन्न, वस्त्र, निवारा आणि पाणी यांकडे लक्ष देणे गरजेचे आहे, असे त्याला जाणवले. हे सर्व शुद्ध स्वरूपात कसे मिळवता येईल हा विचार करत असताना शेती हा पर्याय समोर आला आणि त्या दिशेने प्रवास सुरू करायचा असे ठरले. सन्मित्र मंडळातदेखील हा विचार सुरू होता आणि परस्पर सहकार्य, स्वावलंबन व अधिक स्वातंत्र्य या मानवीय जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींचा विचार करून चार सन्मित्रांनी परभणी जिल्ह्यातील गौर या गावी जून २००३ मध्ये प्रत्येकी तीन एकर या हिशोबाने शेती घेतली. जून २००३ मध्येच मंदारचे शिक्षणही पूर्ण झाले. नोकरी करायची नाही हे ठरले होतेच, पण शेतीची कुठलीही पार्श्वभूमी, अनुभव आणि त्यावेळची शेतीची परिस्थिती बघता आपण शेती करू शकू का, या जीवनशैलीत जगू शकू का, हे प्रश्नदेखील मंदारला सतावत होते. मग या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध सुरू झाला. ही उत्तरे शोधत असतानाच योगायोगाने धीरेंद्र व स्मिता सोने या दाम्पत्याबद्दल मंदारला माहिती मिळाली. स्वतः इलेक्ट्रॉनिक इंजिनीअर असलेले धीरेंद्रभाई आणि एम.एस्सी. असलेल्या स्मितातार्ई या दोघांनी आपली अहमदाबाद येथे असलेली नोकरी सोडून खेडेगावात शेती करण्याचा निर्णय घेतला आणि आज २६ वर्षे दोन एकर शेती व ग्रामोद्योगावर आधारित स्वावलंबी, आनंदी, उत्तम जीवन ते कुटुंबासहित जगत आहेत. सतत धडपड करण्याचा स्वभाव असणाऱ्या मंदारने धीरेंद्रभाई करत असलेले काम अधिक समजून घेण्याकरता गुजरातला भेट देण्याचा निर्णय घेतला. या भेटीदरम्यान आपणही असे जीवन जगू शकतो, हा आत्मविश्वास मंदारला मिळाला आणि तिथून परत आल्यानंतर मंदारने परभणी येथील शेतीकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. परंतु शेती करतानाही अनेक प्रश्न सतावत होते आणि त्यांची उत्तरे आणि विश्वास मिळत नव्हता. त्यामुळे धीरेंद्रभाई यांच्याकडे जाऊन शेती शिकण्याचा निर्णय झाला आणि मंदार त्यांच्याकडे सलग दीड वर्षे त्यांच्या घरातीलच एक सदस्य म्हणून राहून शेती शिकला. गुजरातला काम करत शिकत असताना मंदारचे प्रत्यक्ष जीवन शिक्षणच सुरू होते. कधीही न केलेली पेरणीपूर्व मशागत, निंदण, खुरपणी, कापणी, मळणी करणे सुरुवातीला कठीण जात होते, पण हार न मानता ती कामे मंदार निर्धारपूर्वक करत राहिला. प्रत्येक गोष्टीकडे शिकण्याची संधी म्हणून पाहणे हा त्याचा दृष्टिकोन त्याला मदत करत होता. त्यामुळेच अगदी गावातून शेण गोळा करून आणणे अशी अनेक छोटी-मोठी कामे करताना त्याने कधीच कमीपणा बाळगला नाही. या दीड वर्षांत शेतीवर आधारित जीवनशैली जगता येऊ शकते, हा आत्मविश्वास घेऊनच मंदार परतला. या दरम्यान गौर प्रकल्प काही कारणांनी बारगळला. परंतु मंदारने आणि त्याच्या कुटुंबाने शेतीवर आधारितच जीवनशैली जगण्याच्या केलेल्या ठाम निश्चयामुळे पुन्हा संपूर्ण महाराष्ट्रात शेतीचा शोध सुरू झाला. या शोधानंतर आमगाव (मदनी), जिल्हा वर्धा येथील जमीन घेण्याचा निर्णय घेतला गेला. हे संपूर्ण कुटुंब जून २०१० मध्ये आमगाव येथे राहण्यास आले.

शेतीवर आधारित जीवन का जगायचे, यामागील मंदारचा विचार अतिशय स्पष्ट आहे आणि तो त्याच्या बोलण्यातून वारंवार जाणवतो. शेतीतून स्वावलंबन म्हणजेच शेतीला आवश्यक असणारे बी-बियाणे, खते, कीटकनाशके यांचे स्वावलंबन. सेंद्रिय शेती करत असल्याने शेणखत व काडीकचरा व्यवस्थापनातून, पीक व्यवस्थापनातून तसेच विविध पिके घेऊन जमिनीची सुपीकता वाढवण्याचा प्रयत्न सध्या मंदार करत आहे. तसेच पावसाच्या पडणाऱ्या पाण्याच्या व्यवस्थापनतूनच पाण्याची पातळी वाढवणे आणि टिकवणे याचा प्रयत्नही करणार आहे. मंदारच्या मते, प्रत्येक शेतकऱ्याने आपल्याजवळील पाच टक्के जमीन स्वतःला लागणाऱ्या पिकांसाठी ठेवून उरलेल्या जमिनीतून आवश्यक आर्थिक गरजेची पूर्तता करणे गरजेचे आहे. या पद्धतीने आनंदी, समाधानी, समृद्ध जीवन जगणे शक्य आहे असे त्याला वाटते. शेतीतून स्वावलंबन झाल्यानंतर ग्रामोद्योगातून आर्थिक गरजांची पूर्तता करण्याचा त्याचा विचार आहे. आणि याचीच सुरुवात म्हणून मंदारने गेल्या वर्षी लाल अंबाडी सरबत पावडर, लाल अंबाडी पाचक गोळी, मसाला बोरं, पेरूचे चॉकलेट अशी उत्पादने तयार केली आणि आज पुण्या-मुंबईच्या ग्राहकांपर्यंत ही उत्पादने मंदार पोचवत आहे.

या वाटचालीदरम्यान मंदारचा संपर्क डॉ. अभय बंग आणि डॉ. राणी बंग यांनी युवकांनी अर्थपूर्ण जीवन जगावे याकरिता सुरू केलेल्या 'निर्माण' या युवा चळवळीशी आला. याद्वारे त्याला विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचे मार्गदर्शन मिळत आहे. विनोबांनी केलेल्या स्वभाव-स्वधर्म-युगधर्म या मांडणीतून स्वतः अशी जीवनशैली जगत असताना इतर शेतकऱ्यांनाही अशी जीवनशैली जगण्यासाठी विश्वास वाटावा यासाठी वेळोवेळी योग्य ते बदल करणे गरजेचे आहे; जेणेकरून परिवर्तन घडणे सोपे जाईल ही दृष्टी मंदारला मिळाली. तसेच समविचारी मित्रांची साथ मिळाली. याचसोबत गांधीजी-विनोबा यांच्या विचारांचे वाचन आणि गांधीजी-विनोबांनी मांडलेल्या विकेंद्रीतता, साधी राहणी, गाव स्वावलंबन, परस्पर सहकार्य, जगण्यातून मूल्य निर्मिती आणि जगताना तीन एच - (Hand-Heart-Head) या विचारांना आपलेसे करत जगण्याचा प्रयत्न मंदार करत आहे.

'सामाजिक काम मोठ्या प्रमाणात करण्यापेक्षा आपल्या जीवनातील बदलासाठी सातत्याने प्रयत्न करत राहायचे आहे. चांगल्या पद्धतीने, आनंदाने, सहज पद्धतीने जीवन आपण जगू लागलो तर त्यातून समाज काही घेऊ शकतो. तेही एक सामाजिक काम ठरू शकते. आपण स्वतः बदल करून वागू लागल्यानंतर त्यासंबंधी जरी इतरांना सांगू लागलो तर नक्कीच प्रभाव जास्त पडतो आणि बदलाची शक्यता वाढते. स्थानिक स्तरावर काम करण्याचा गांधीजींचा विचार मला अधिक भावतो. ते जास्त मूलभूत काम आहे आणि सातत्याने तसे प्रयत्न केल्यास बदल निश्चित घडू शकतो,' असे ठाम मत आणि विश्वास मंदारचा आहे. याचेच प्रत्यंतर असे की, मंदार ज्या गावी राहतो, त्याच गावी पुढील एका वर्षात त्याचे तीन मित्र येऊन राहण्याचा विचार करत आहेत.

या आत्तापर्यंतच्या प्रवासात मंदारच्या कुटुंबाची अतिशय मोलाची साथ त्याला मिळाली आहे, पुढेही मिळत राहील. गेल्या १०-१२ वर्षांत घरात झालेल्या चर्चा, वातावरण याचा प्रभाव मंदारच्या लहान बहिणीवरही पडला आहे. आणि म्हणूनच आजच्या शेतीसाठी अवघड असणाऱ्या परिस्थितीत आणि शेतकऱ्याला सहसा मुलगी न देण्याची मानसिकता असतानाही शेतीवर आधारितच जीवन जगण्याचा कौतुकास्पद निर्णय मंदारच्या बहिणीने घेतला आहे. चांगल्या आणि संतुलित जीवनाच्या विचारपूर्वक चालू असलेल्या प्रवासात मंदार समाधानी आहे आणि हे समाधान त्याच्याशी बोलताना त्याच्या चेहऱ्यावर दिसते. अजून अनेक प्रश्न आहेत, अनेक आव्हाने आहेत पण या सर्वांना सामोरं जाण्याची मंदारची तयारी आहे. त्याचा हा निश्चय त्यानेच सांगितलेल्या दोन ओळींतून दिसतो-

'निश्चय-निष्ठा-नीती यांचे कंकण बांधून हाती
व्रतस्थ होऊनी व्यापून टाकू विश्वाच्याही मिती '

संपर्क : मंदार देशपांडे-
mandar9999@gmail.com
career.vruttant@expressindia.com

## प्रकाशाचे कवडसे

गौरी चौधरी



मंदार देशपांडे हा युवा अभियंता वर्धा जिल्ह्यातील आमगाव या गावी गेली अडीच वर्षं शेतीआधारित आणि पर्यावरणस्नेही जीवन जगत आहे. शेती आणि ग्रामोद्योग आधारित जीवनशैलीला अंगीकारत स्वावलंबनाच्या दिशेने त्याची वाटचाल सुरू आहे. त्याविषयी ...

लोकसत्ता Mon, 11 March 2013
www.readwhere.com/read/c/2696153



# अन्न गुडगुडे, नाड गुडगुडे दुष्काळ: ढिशक्यांव  ढिशक्यांव ढिशक्यांव

*पानी फाउंडेशनतर्फे गावागावात आयोजित करण्यात आलेली जलसंधारणाची स्पर्धा म्हणजे सत्यमेव जयते वॉटर कप. या स्पर्धेत आर्वी तालुक्याच्या समन्वयाची मोठी जबाबदारी मंदार देशपांडेने स्वीकारली. घरच्या सेंद्रीय शेतीकडे दुर्लक्ष करून ही जबाबदारी स्वीकारताना झालेली चलबिचल ते महाराष्ट्रातील १३०० गावांमधून आर्वी तालुक्यातील काकडदरा गावाला मिळालेले पहिले बक्षीस... मंदारने शेअर केलेला हा प्रामाणिक प्रवास...*

**To be or not to be...**

माझा मित्र चिन्मय फुटाणे याने मला पानी फॉउंडेशनसोबत काम करण्याबद्दल विचारले. मी सेंद्रीय शेती व शेतीआधारित उद्योग करतो. चार वर्षांपासून केलेली उद्योगाची सुरूवात एका टप्प्यावर होती. योग्य आर्थिक मोबदला मिळण्यास सुरूवात व्हावा यासाठी आता त्याची व्याप्ती वाढवण्याची गरज होती. तसेच शेतीही एका टप्प्यावर होती. आता उत्पादन वाढ, भाजीपाला लागवड, फळझाड लागवड, खत-फवारणी व्यवस्थापन यांची व्याप्ती वाढवणे गरजेचे होते. मी नसताना या सर्व व्यवस्थेकडे पहायला कोणी नव्हते. तसेच 'खूप झटून लोकांसाठी काम केल्याने लोकांमध्ये बदल होईल का?' हाही प्रश्न होताच. किंबहुना नाही असेच माझे मत होते! या सर्व कारणांमुळे माझी काम करण्याची तयारी नव्हती. पण चिन्मय म्हणत होता की हे काम करून तुला शेतीही करता येईल. त्याच्या अनुभवावर मी विश्वास ठेवला. मानधनही चांगले होते. हो नाही करता करता 'सत्यमेव जयते वॉटर कप' स्पर्धेसाठी मी आर्वी तालुक्याचा (जि. वर्धा) समन्वयक म्हणून काम करू लागलो.

**१५ दिवसांत १४० गावांचा सहभाग कसा मिळवावा?**

४ दिवसांच्या प्रशिक्षणानंतर १५ जानेवारीपासून आम्ही आर्वी मध्येच राहायला गेलो. वॉटर कपमध्ये गावांनी सहभाग नोंदवण्यासाठी ३१ जानेवारी ही अंतिम तारीख होती. तहसील कार्यालयातून कळले की आर्वी तालुक्यात ७२ ग्रामपंचायतींमध्ये २२२ गावे आहेत. त्यातील १४० ही लोकवस्तीची, तर इतर गावे उजाड आहेत. कितीही धावपळ केली तरी आम्ही २ तालुका समन्वयक १५ दिवसांत १४० गावांपर्यंत पोहचून त्यांनी वॉटर कपमध्ये सहभाग घ्यावा म्हणून ग्रामसभा घेणे शक्य नव्हते. मग काय करावे?



ग्रामसभा घेण्यासाठी मदतीला आलेले निर्माणी

अभ्यास करताना लक्षात आले की ७२ ग्रामपंचायती ह्या पंचायत समितीच्या १२ गणांमध्ये विभागल्या गेल्या आहेत. मग गणनिहाय बैठका घेण्याचे ठरले. या गणनिहाय सभा एकाच दिवशी २ गणांमध्ये घेऊन आम्ही २ समन्वयकांनी ६ दिवसांत संपवल्या. दिवसा या सभा व रात्री गावसभा

चालू होत्या. ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, तलाठी यांच्यामार्फत प्रवेश अर्ज गावागावांपर्यंत पोहचवून काम करणे सुरू होते.



पानी फाउंडेशनच्या प्रशिक्षणात सहभागी ग्रामस्थ

पाणी प्रश्न हा महिलांसाठी महत्वाचा प्रश्न आहे. महिलांना दुरून पाणी आणावे लागते. पाळीव जनावरांसाठी, भांडी व कपडे धुण्यासाठी पाण्याची व्यवस्था करावी लागते. जर महिलांना वॉटर कपची संकल्पना पटली तर त्या येणाऱ्या २६ जानेवारीच्या ग्रामसभेत वॉटर कपमध्ये सहभाग घेण्यासाठी जोर लावू शकतील. म्हणून २४ जानेवारीला आम्ही महिला मेळावा घेतला. महिला बचत गट पंचायत समितीअंतर्गत असतात. त्यांच्या सहकार्यामुळे या महिला मेळाव्याला १५०० महिला विविध गावांतून उपस्थित होत्या. डॉ. अविनाश पोळ सरांचे मार्गदर्शन, महिलांनी बसवलेली पाणी प्रश्नावरची एकांकिका, 'दुष्काळाशी दोन हात' ही फिल्म यांनी मेळाव्यात रंग भरला आणि महिला उत्साहाने गावोगावी परतल्या.

२६ जानेवारी रोजी होणाऱ्या ग्रामसभांमध्ये वॉटर कप मध्ये सहभागी होण्याचे आवाहन करता आले तर? फारच शॉर्ट नोटीसवर निर्माणची २६ युवक युवती २५ जानेवारीच्या संध्याकाळपर्यंत आर्वीला पोहोचले. या २६ निर्माणींनी ३० ग्रामसभांमध्ये मांडणी केली.

या कार्यक्रमांचा परिणाम उत्तम झाला. ८२ गावांचे प्रवेश अर्ज आले. पानी फाउंडेशनतर्फे आयोजित प्रशिक्षण शिबिरात पाणलोट उपचार शिकण्यासाठी आता प्रत्येक गावातून ५ जण येणार होते, पानीने घातलेल्या अटींनुसार त्यात २ महिलांचा समावेश होता.

### गावांनी टीमच्या सदस्यांची नोंदणी तर केली, पण ते खरंच प्रशिक्षणाला येतील?

प्रशिक्षण पहिल्या वॉटर कपमध्ये सहभागी लोणी (जि. अमरावती, ता. वरुड) या गावी होते. फेब्रुवारीमध्ये आर्वी तालुक्यात निवडणूक आल्या. त्यामुळे मार्चमध्ये आम्हाला सलग प्रशिक्षण बॅचेस घ्याव्या लागल्या. ४०-४० जणांची एक प्रशिक्षण बॅच होती. इथे मात्र कस लागला. जमेल तसे भेटून, वारंवार फोन करून आम्ही लोकांना प्रशिक्षणाला येण्यासाठी प्रोत्साहित करत होतो. प्रशिक्षणासाठी नावे दिलेल्यांनी अचानक नाही म्हटल्यामुळे ऐनवेळी नवीन माणूस तयार करणे, टीममध्ये महिला आवश्यक असल्याने त्यांना तयार करणे, शेतीची कामे असताना ४० ची बॅच तयार करणे अवघड होते. एक समन्वयक बॅचला घेऊन प्रशिक्षणाला जाई, तर एक पुढच्या बॅचला तयार करण्यासाठी आर्वीमध्ये थांबत असे. याकाळात स्वतःचे motivation जपणे हीही कसरत होती.

प्रशिक्षणामध्ये motivation साठी प्रार्थना, गाणी, खेळ, आमीर खान यांचा फिल्मद्वारे मराठीतून संदेश होता. पाणलोट उपचारांचे महत्त्व व तंत्र समजावे यासाठी फिल्म्स, उपचारांचा परिणाम डोळ्यांनी बघता यावा यासाठी खास बनवलेले मॉडेल्स, काही प्रयोग, लोणी गावचे काम

पाहण्यासाठी शिवारफेरी व गावक-यांसोबत प्रश्नोत्तरे, प्रत्यक्ष श्रमदान होते. चार दिवसांच्या प्रशिक्षणानंतर लोक गाव पाणीदार करण्याच्या निश्चयानेच परतत होते.



"महाराष्ट्रातील सर्वोत्तम एल.बी.एस." - पोपटराव पवार

ज्या गावांनी प्रशिक्षण पूर्ण केले तीच गावे स्पर्धेत राहणार होती. त्यामुळे आर्वी तालुक्यातून प्रशिक्षणाला न आलेली ३० गावे स्पर्धेच्या बाहेर पडली. हे अवघड होते पण शिस्त लागण्यासाठी योग्यच होते. शिस्त नि शास्त्र ही पानी फॉउंडेशनची महत्वाची तत्वे होती.

**स्पर्धा सुरू... चले चलो**

८ एप्रिल ते २२ मे असा ४५ दिवसांचा स्पर्धेचा कालावधी होता. ७ एप्रिलला मध्यरात्रीनंतर १२ वाजून १ मिनिटांनीच काही गावात लोकांनी श्रमदान सुरू केले. आमच्या सोबत पानी फाउंडेशनचे दोन तांत्रिक अधिकारी श्री. प्रविण बागडे (WOTR संस्थेचा १८ वर्षांचा अनुभव) व श्री. प्रणव गोरीवले सहभागी झाल्यामुळे गती वाढली. या दोघांसोबत टीम बनवून गावागावात फिरून जमिनीचा उतार काढण्यास मदत करणे, उपचारांचे नियोजन-आखणी करण्यास मदत करणे, लोकांना प्रोत्साहन देत राहणे हे काम सातत्याने सुरू होते.

काही गावांत कमी, काही गावांत मध्यम, तर काही गावांत जास्त प्रतिसाद होता. सर्वच ठिकाणी पुरे पडणे आम्हाला शक्य नव्हते. जेथे जास्त लोकसहभाग होता तेथे आम्ही अधिक लक्ष देत होतो. सोबतच गावातील लोक तांत्रिकदृष्ट्या तयार करत होतो.

श्रमदानासोबतच मशीनद्वारे करायच्या पाणलोटाच्या कामांचे नियोजन करावयाचे होते. भारतीय जैन संघटना पूर्ण महाराष्ट्रात मशीन देणार होती. जास्त मशीन उपलब्ध नव्हत्या आणि मशीन शिफ्टिंग हा मोठा विषय होता. त्यामुळे योग्य श्रमदान झाले त्या गावांना मशीन मिळण्यासाठी मदत करायची असे धोरण आम्ही ठरवले होते.

स्पर्धा आता अंतिम टप्यात आली होती. कामाचा वेग अधिकच वाढला होता. स्पर्धेत टिकू शकणाऱ्या गावांमध्ये शेवटच्या ८ दिवसांत अधिक लक्ष देऊ लागलो. रात्रीच्या ग्रामसभा घेऊन गावागावात श्रमदान व मशीनने करायच्या कामाचे टार्गेट किती बाकी आहे हे समजावू लागलो. काय केल्याने ही टार्गेट्स पूर्ण होऊ शकतील हे ही समजावू लागलो. आली वेळ तर गावातच मुक्काम होत होता. आंघोळ, कपडे याचा काही पत्ताच नव्हता. गावांनीही उत्तम प्रतिसाद दिला.

बघता बघता २२ मेचा दिवस उजाडला. आता केलेल्या कामाचे मोजमाप कामाच्या फोटोसहित पानी फाउंडेशनच्या ॲपमध्ये २५ मे पर्यंत भरायचे होते. त्यामुळे एकाचवेळी २-३ टीम्स मोजमाप भरत होत्या. काही ठिकाणी फोनमधील जागा संपल्याने फोटो निघत नव्हते. काही गावात नेटवर्क नसल्याने ही सर्व माहीती पानी फाउंडेशनला पाठवणे कठीण होते. अशा सर्व अडचणी सोडवत हेही काम गावांनी पूर्ण केले.

तालुकास्तरीय बक्षिसाला पात्र ठरण्यासाठी श्रमदानाने कमीतकमी १,००० घन मीटर आणि मशीनने कमीतकमी २०,००० घन मीटर पाणीसाठ्याची क्षमता निर्माण करणे गावासाठी आवश्यक होते. तसेच राज्यस्तरीय बक्षिसाला पात्र ठरण्यासाठी श्रमदानाने कमीतकमी २,५००

बक्षिसाला पात्र ठरण्यासाठी श्रमदानाने कमीतकमी २,५०० घन मीटर आणि मशीनने कमीतकमी ५०,००० घन मीटर पाणीसाठ्याची क्षमता निर्माण करणे गावासाठी आवश्यक होते. त्यानुसार आर्वी तालुक्यात ४ गावे नियमानुसार व्हेरिफिकेशनसाठी होती.

आता हे गावांनी टाकलेले मोजमाप योग्य आहे की नाही हे तपासणे गरजेचे होते. अन्यथा चुकीचे मोजमाप टाकलेले गाव पुढे जाऊ शकत होते. या तपासणीसाठी विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र या विभागांतील तांत्रिक टीम्सना त्याच विभागातील तालुके बदलून दिले गेले. पुढच्या टप्प्यात प्रत्येक विभागातल्या गावांचे व्हेरिफिकेशन दुस-या विभागातल्या तांत्रिक टीम्सनी केलं. निःपक्ष परीक्षण होण्यासाठी हे आवश्यक होते. यानंतर महाराष्ट्रातील उत्कृष्ट १२ गावे निवडून श्री. पोपटराव पवार यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय परीक्षण करण्यात आले. १२ गावांची वॉटर बजेट मांडणी व कामांची गुणवत्ता काटेकोरपणे तपासली गेली. यातून राज्यस्तरावरचे पहिले ३ नंबर निवडले जाणार होते. पहिले बक्षीस होते ₹ ५० लक्ष, दुसरे होते ₹ ३० लक्ष आणि तिसरे होते ₹२० लक्ष.

**आणि विजेते आहेत...**

वॉटर कपचा निकाल हा बालेवाडी क्रीडा संकुल, पुणे येथील स्टेडीयममध्ये भव्यदिव्य अशा सोहळ्यात जाहीर झाला. या कार्यक्रमाला आर्वी तालुक्यातील सहभागी गावांमधल्या श्रमवीरांना उपस्थित राहता यावे याकरिता शासनाद्वारे ३ राज्य परिवहन बसची सोय करण्यात आली होती. या बसमधून आर्वी तालुक्यातील १२० श्रमवीर ग्रामस्थ या सोहळ्याकरिता उपस्थित होते.

राज्यस्तरावरच्या बक्षीसासाठी पात्र १२ गावांमध्ये काट्याची टक्कर होती. एकएक करून बक्षीसांची घोषणा होऊ लागली- तिसरा, दुसरा आणि शेवटी पहिला क्रमांक. महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले आर्वी तालुक्यातील काकडदरा हे आदिवासी गाव; आणि बालेवाडी स्टेडिअममध्ये घुमला निर्माणींना परिचित नारा - अन्न गुडगुडे, नाड गुडगुडे दुष्काळ: ढिशक्यांव ढिशक्यांव ढिशक्यांव !

बोथली (नटाला), नेरी मिर्झापूर आणि पिंपळगाव भोसले हे तालुका स्तरावर अनुक्रमे पहिल्या, दुसऱ्या आणि



**'अन्न गुडगुडे नाड गुडगुडे'चा नारा देताना मंदार**

तिसऱ्या क्रमांकाच्या बक्षिसाचे मानकरी ठरले. काकडदऱ्याला पाणी फाउंडेशनतर्फे ५० लाखाचे बक्षीस व सत्यमेव जयते वॉटर कप मिळाला. तर बोथली (नटाला) ला पानी फाउंडेशनतर्फे १० लाख रूपये आणि ट्रॉफी व महाराष्ट्र शासनातर्फे ८ लाख रूपये मिळाले. महाराष्ट्र शासनातर्फे नेरी मिर्झापूरला ७.५ लाख रूपये आणि पिंपळगाव भोसलेला ५ लाख रूपयांचे बक्षीस मिळाले.




**बालेवाडी येथे झालेल्या सोहळयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हस्ते प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना काकडधरा गावचे ग्रामस्थ**

---

**काकडद-यासाठी सर्वात मोठे बक्षीस कोणते होते?** प्रचंड कष्टाने निर्माण केलेली पाणी साठवण्याची क्षमता, त्यात साठलेले पाणी, ३० वर्षांनंतर पुन्हा ताकदीने एकत्र झालेले गाव, आणि "महाराष्ट्रात इतक्या उत्तम प्रतीचे एल.बी.एस. मी याआधी पाहिले नाही." अशी पोपटराव पवारांनी दिलेली कौतुकाची थाप!

## तुफानाचे गाव...

"एकजुटीने पेटलं रान, तुफान आलंया..." हे थीम सॉंग रात्री ११ वाजता एका गावात सत्यमेव जयते वॉटर कपची वातावरण निर्मिती करत होते. निमित्त होते गावसभेचे जी आम्ही निर्माणींनी आयोजित केली होती. रात्री गावात पोचण्याची काही सुविधा नव्हती. मात्र गावातल्या लोकांनी आमच्यासाठी मुख्य रस्त्यापर्यंत एक ऑटो पाठवल्यामुळे आम्ही १०.३० गावी पोचलो होतो. लोक आमची वाटच पाहात होते. आम्ही लगेच सर्व व्यवस्था करून 'दुष्काळाशी दोन हात' ही फिल्म दाखवली आणि पानी फाउंडेशन व वॉटर कपबद्दल मांडणी केली. अत्यंत शांतपणे सर्वांनी संपूर्ण कार्यक्रम पाहिला व त्यानंतर चर्चापण केली. रात्री १२ ला ही गावसभा आटोपली व आम्ही गावातच झोपलो. दुस-या दिवशीची सकाळ अनेक आश्चर्यांसह आमची वाट पाहत होती.

सकाळी नाष्टा-चहा झाल्यावर गावातल्या नामदेवराव, दौलतभाऊ व इतर लोकांनी गावशिवार फेरीसाठी नेले. गावातले लोक चक्क रिज लाईन, माथा ते पायथा, LBS, CCT, जमिनीचा उतार अशा टेक्निकल भाषेत बोलत होते. पाणलोटाचे शास्त्र सांगत होते. गावात १९८६ पासूनच पाणलोटाची शास्त्रशुद्ध कामे झाली होती. ज्या गावाला पाणलोटाचे सर्व शास्त्र माहीत होते, त्या गावाने काल रात्री नवख्या मुलांनी पाणलोटाविषयी सांगितलेले सर्व काही शांतपणे ऐकून घेतले होते. आम्ही

भारावून गेलो. येथूनच त्या गावाच्या खऱ्या ओळखीला सुरुवात झाली. ते गाव होते काकडदरा!!

काकडदरा हे आर्वी तालुका मुख्यालयापासून ४० किमी अंतरावर, समुद्र सपाटी पासून ३८५ मीटर उंच, जंगलाच्या कुशीत वसलेले, ३७६ लोकसंख्येचे गाव. संपूर्ण वस्ती आदिवासी. मुख्य रस्त्यापासून आत आहे. सरकारी प्रवास साधने नाहीत. गट ग्रामपंचायत असल्याने, तसेच पंचायत समितीच्या विरुळ गणातील दूरचे शेवटचे गाव असल्याने दुर्लक्षित.

या गावात ८६ नंतर विदर्भाच्या पाणलोटाचे pioneer असलेल्या श्री. खडसे सरांच्या मार्गदर्शनाखाली व असेफा संस्थेतर्फे काम सुरू झाले. त्यावेळी गावात १०-१२ दारुच्या भट्टया होत्या. जंगलातील लाकडाच्या मोळ्या विकून उपजीविका चालत होती. उन्हाळ्यात पाण्याची कमतरता होती. अशा परस्थितीत असेफाचे कार्यकर्ते श्री. घनश्याम भीमटे परिवारासहित तेथे राहायला गेले. त्यांच्या माध्यमातून हळूहळू अवैध जंगलतोड बंद झाली, अंगणवाडी सुरु झाली, दारुबंदी झाली. जलसंधारणाची कामे सुरू झाली. शेतांवर बांधबधिस्ती, कंटूर बांध झाले. इतर ठिकाणी LBS, CCT, मातीनाला बांध झाले. यामुळे पाण्याच्या पातळीत वाढ झाली. सामुहिक विहिरीतून ओलित होऊन ८-१० शेतं भिजू लागली. कंटूरमुळे पीक उत्पादनात वाढ झाली. रोपवाटिका सुरु झाली. दर बुधवारी गावसभा होऊ लागली. ग्रामकोष जमा होऊ लागला. आठवड्यातून एक दिवस श्रमदान होऊ लागले. CCT व सागाची झाडे यासाठी सामाजिक वनीकरण विभागाकडून मिळालेले ५००० रुपये लातूरच्या भूकंपग्रस्तांसाठी पाठवून गावाने नवीन आदर्श निर्माण केला. अशा व्रतस्थतेने चांगली कामे झाल्याने ठाकुरदास बंग, अण्णा हजारे, रतन टाटा असे मोठे लोक-सामाजिक कार्यकर्ते व संस्था भेट देऊ लागले.

मात्र १०-१५ वर्षांनी असेफाचे काम बंद झाले. काही वर्षे ‘धरामित्र’ने काम केले. पण काही कारणास्तव हेही काम बंद झाले. २०१३ ला ढगफुटी झाली. प्रचंड पावसामुळे २ मातीनाला बांध फुटले आणि पाणी टंचाईला सुरुवात झाली.

२०१७ मध्ये पानी फाउंडेशनमुळे वॉटर कपची संधी चालून आली. पाणलोटाचे शास्त्र व फायदे माहीत असल्याने हे आव्हान त्यांनी स्वीकारले. प्रशिक्षणाने उत्साहित झालेल्या प्रशिक्षणार्थींनी गावसभा घेऊन लोकांमध्ये उत्साह जागवला. संपूर्ण गाव कोरडवाहू म्हणजे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने मजुरीसाठी इतरत्र कामाला जात असते. पण स्पर्धेच्या कालावधीत (४५ दिवस) मजुरीवर न जाता काम केले. स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी, ८ एप्रिलला मा. जिल्हाधिकारी व इतर अधिकारी गावात आले तेव्हा त्यांना १०० लोक श्रमदान करण्यात मग्न दिसले. त्यांना आश्चर्य वाटले. गावाची परिस्थिती समजल्यावर जिल्हाधिका-यांनी तात्काळ सर्व कामे रोजगार हमीमध्ये घेण्याचे आदेश दिले व सातत्याने त्याचा आढावा घेतला. लोक अधिक जोमाने कामाला भिडले. रोज जवळपास ८० ते १०० लोक कामाला असायचे. विशेषतः महिलांची उपस्थिती जास्त होती- जवळपास ५०-६०! अत्यंत मन लावून रोज सकाळी ७ ते दुपारी १ व शक्य त्या दिवशी संध्याकाळी ४ ते ६ लोकांनी काम केले. प्रति माणूस ६ घन मीटर असणारे श्रमदानाचे उद्दिष्ट गावाने उत्कृष्ठ गुणवत्तेचे काम करत पूर्ण केले.

हे गाव एकजूट आहे. जेव्हा जेव्हा आम्ही गावात सभा बोलावली तेव्हा तेव्हा पूर्ण गाव सभेला उपस्थित राहात असे. कधी कधी १०-११ वाजेपर्यंत सभा चाले, तरी सर्वजण बसलेले असत. गाव विचारी आहे. कोणताही विषय पूर्ण समजून घेऊन, प्रश्नांवर चर्चा करुन निर्णय घेतले

जातात. प्रत्येकाचे अर्धा एकर ओलित व्हावे एवढी माफक गावातील लोकांची अपेक्षा आहे. कितीतरी वेळा गावात राहण्याचा प्रसंग आला. गावाने नेहमी जेवणाची, राहण्याची चांगली व्यवस्था केली. महिलांविषयी बोलावे तेवढे कमी आहे. श्रमदानात मोठया संख्येने, गावसभेत मोठ्या संख्येने; तालुका व राज्य परीक्षक गावात आले तेव्हा गावसभेत व शिवारफेरीत मोठ्या संख्येने महिलाच उपस्थित होत्या. जास्त प्रश्नांची उत्तरेही महिलांनीच दिली.

राज्य परीक्षक टीमने गावात झालेल्या सर्व कामांची प्रशंसा केली. त्या टीमचे अध्यक्ष मा.पोपटराव पवार म्हणाले, “काकडद-यासारखे अनघड दगडी बांध (LBS) आख्ख्या महाराष्ट्रात नाहीत. शिवार फेरीत एवढ्या मोठ्या प्रमाणात महिला कुठेही नव्हत्या. मशीनच्या कामाची गुणवत्ताही चांगली आहे.” याच उत्तमतेच्या गुणवत्तेवर काकडद-याने सत्यमेव जयते वॉटर कपमध्ये महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मान मिळवला. वॉटरकप आणि ५० लक्ष रुपये असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

## तूफान पेलणारे हात

आर्वी तालुक्यातील प्रशासन सुरूवातीपासूनच या स्पर्धेसाठी उत्साही होते. प्रत्येक विभागातील अधिका-यांनी आम्हाला भरभरून सहकार्य केलं. कुणी गावागावात बैठकी आयोजित करण्यासाठी मदत केली; कुणी रात्रीच्या वेळीही गावसभांसाठी उपस्थित राहून मार्गदर्शन केले; कुणी स्पर्धा सुरू झाल्यावर नियंत्रण कक्ष स्थापन करून गावांचा रोज आढावा घेणे सुरू केले; कुणी रोजगार हमीच्या कामांना प्रशासकीय मान्यता तात्काळ देऊन कामांना वेग आणला; कुणी मशीनच्या कामांसाठी योजनेतून डिझेल पुरविण्याचे लाखो रुपयांचे काम आडकाठी न आणता सहकार्याने केले.

रोटरी क्लब मुंबई व नागपूर यांनी काकडद-यात लोकांची बैठक घेऊन मिळून काम करण्याचे ठरवले. त्यामुळे मशीनचे असलेले प्रति हेक्टर १५० घन मीटर पाणीसाठा निर्मितीचे काम उत्तमरीतीने पूर्ण झाले.

वॉटर कपमधील निर्माणींच्या योगदानाबद्दल आपण वेळोवेळी सीमोल्लंघन मध्ये वाचले आहे. इथे मला कुणाल परदेशी (निर्माण ६) व डॉ. सावित्री (निर्माण ७) यांच्या योगदानाचा विशेष उल्लेख करायचा आहे.

कुणालला ‘झुंज दुष्काळाशी’ या निर्माणच्या उपक्रमांतर्गत कृती कार्यक्रमाची आखणी व अंमलबजावणी या दोन्हीचा अनुभव होता. त्यानंतर मुख्यमंत्री ग्रामपरिवर्तन दूत म्हणून त्याची निवड झाली.



**श्रमदान करतांना कुणाल परदेशी**

फेलोशिप सुरू व्हायला वेळ असल्याने गावपातळीवर काम करून अनुभव घ्यायचे त्याने ठरवले. आमच्याकडेही कामाचा व्याप नि कार्यकर्त्यांची गरज खूप होती.

गावांनी वॉटर कप स्पर्धेत सहभाग घ्यावा म्हणून निर्माणींमार्फत २६ जानेवारीला गावागावात ग्रामसभा घेणे, सहभाग नोंदवल्यानंतर पानी फाउंडेशनच्या प्रशिक्षणासाठी गावांच्या टीम्स जमवून पाठवणे, प्रशिक्षणानंतर पाणलोटाच्या नियोजनासाठी गावागावांना तांत्रिक सहकार्य

करू शकणारे स्वयंसेवक तयार करणे इ. अनेक कामे आम्ही एकत्र केली. या कामांचे नियोजन, प्रशिक्षणाची आखणी, फोन करून स्वयंसेवकांचा-प्रशिक्षणार्थींचा फॉलोअप घेणे, जेवण व इतर व्यवस्था पाहणे इ. कोणतीही



**मेडिकल चेकअप करताना सावित्री**

आणि सर्वच कामे कुणालने केली. त्याने स्वतः पानी फाउंडेशनचे प्रशिक्षण घेतले. मग स्पर्धेदरम्यान गावागावांत फिरून जमिनीचा उतार काढण्यास मदत करणे, पाणलोटांच्या उपचारांची आखणी करुन देणे यातही त्याने स्वतःला झोकून दिले. स्पर्धा संपायला ८ दिवस राहिले असताना काकडदरा गाव जेव्हा राज्य स्तरावर बक्षीस मिळवू शकते असे वाटू लागले, तेव्हा कुणालने काकडद-यातच ठाण मांडला. श्रमदानाचे टारगेट पूर्ण करणे कठीण वाटू लागले तेव्हा ४५ डिग्री तापमानात स्वतः रोज श्रमदान केले. रोजची टारगेट्स ठरवून पूर्ण करून घेण्यात पुढाकार घेतला.

'कुणाल सर' म्हणून त्याची गावागावात ओळख होऊ लागली. प्रचंड प्रेरणेने त्याने तब्बल ३-४ महिने voluntarily काम केले. योगायोगाने त्याला काकडदरा समाविष्ट असणारी सालदरा ही ग्रामपंचायत fellowship साठी मिळाली आहे.

सावित्री श्रमकार्यासाठी आली असताना आरोग्यासाठी आपण काकडदरा येथे काही तरी करुयात असे मी सुचवले होते. महिलांमधील ॲनिमियासाठी हिमोग्लोबिन टेस्ट करायचे ठरले. निर्माण शिबिरात असताना काकडदरा प्रथम आल्यावर आपणच जिंकलो असे तिला वाटले. शिबिरातून परत आल्यावर सावित्री तिच्या सुप्रभा व तेजस्विनी या २ मैत्रिणींसह काकडदरा येथे हिमोग्लोबिन टेस्टिंग किटसह दाखल झाली. त्या तिघी, कुणाल व मी मिळून दिवसभरात १०० महिलांचे हिमोग्लोबिन टेस्टिंगसाठी रक्त घेतले. आता ते लॅब मध्ये टेस्ट करुन मग result आल्यावर पुढील दिशा ठरवू. आरोग्याच्या विषयावर काकडद-यात बरेच काम करायचे आहे. ज्यांना इच्छा आहे त्यांनी जरूर जोडल्या जावे.

## माझे शिक्षण

मी शेती करत असल्याने मला पाणलोटाच्या विविध उपचारांची माहिती होती. काही उपचार मी माझ्या शेतावर केलेले होते. गावात राहात असल्याने गावातील लोकांच्या मानसिकतेचा अंदाज होता. अनेक ठिकाणी जोडलेला असल्याने अनेकांचे इनपुट्स घेता आले. गावसभेत बोलण्याचा अनुभव येथे कामाला आला. Technical background असल्याने पाणलोटाचे शास्त्र गावकऱ्यांपर्यंत पोचवता आले. Coordinator बरोबरच technical कामही करता आले.

एका गावात शेवटच्या ३-४ दिवसात राजकारण झाले, त्यामुळे त्यांची मशीन कामे अपूर्ण राहिली. नाहीतर तालुका स्तरावर त्या गावाने बक्षीस आणले असते. १-२ लोकांनी राजकारण केले, श्रम केलेल्या अनेकांना याचे वाईट वाटले. दुस-या एका गावात १६०० लोकसंख्या होती, पण ४५ दिवस सातत्याने फक्त २५ लोक काम करत होते. Hats off to their spirit! एक तर भारी गोष्ट घडली-एका गावात छोटा मंदार तयार झाला. पांजरा

(बोथली) नावाच्या एका गावात चांगले काम झाले. तेथे एक लहान मुलगा रोज काम करायचा. बोलता बोलता तो एकदा म्हणाला की मी पुढे मंदार सरांसारखे काम करणार. त्याचे नाव लोकांनी छोटा मंदार ठेवले. यापेक्षा जास्त काम केल्याची सार्थकता काय असू शकते?

यापूर्वी मी व्यवस्थेमध्ये काम केले नव्हते. एका मोठ्या व्यवस्थेमध्ये काम करण्याचा अनुभव व शिक्षण झाले. प्रशासनाची कामे कशी चालतात, त्यांच्या अडचणी काय असतात याचा प्रत्यक्ष अनुभव आला. प्रशासन नि लोकांमधला संवाद वाढण्याची गरज जाणवली. दोघे एकत्र आले तर चांगले काम होऊ शकते हे जाणवले. सामान्य माणसांत खूप ताकद असते. त्यांना योग्य प्रशिक्षण व support दिला तर लोकच चांगले काम करून दाखवतात. त्यामुळे 'लोकांसाठी' पेक्षा 'लोकांसोबत' काम करणे जास्त effective असते असे जाणवले.

महाराष्ट्र शासन पानी फाउंडेशन सोबत होते. त्यामुळे तालुका स्तरावरील प्रशासनाने त्यात लक्ष घातले. प्रशासन व गाव यातील संबंध खूप चांगले नव्हते. पण वॉटर कपमुळे ही दरी कमी झाली. जलयुक्त शिवार ही सरकारी कृषी विभागाची योजना होती; वॉटर कप ही लोकांची योजना होती. जलयुक्त शिवार मध्ये लोकांचे प्रतिनिधित्व नव्हते. वॉटर कप मध्ये लोक नि सरकार मिळून कामे ठरवत होती. जलयुक्त शिवारमध्ये काम करण्यावर जास्त भर होता, गुणवत्तेवर कमी. वॉटर कपमध्ये गुणवत्तेला १० गुण होते. जलयुक्त शिवारमध्ये पायथ्याशी जास्त कामे झाली, जसे की नाला खोलीकरण. वॉटर कपमध्ये माथा ते पायथा काम करण्यासाठी १० वेगळे गुण होते. वॉटर कपमध्ये शेतकऱ्यांच्या शेतावर कामे झाली, ओघळावर - छोट्या नाल्यावर कामे झाली. त्यामुळे प्रत्येक शेतकरी याच्याशी जोडला गेला. प्रत्येक घरी शोषखड्डे झाल्याने प्रत्येक घर जोडले गेले. जलयुक्तमध्ये मशीन काम झाले पण त्याच्या मोजमापाशी लोकांचे देणे घेणे नव्हते. वॉटर कपमध्ये शासनाने / संस्थेने मशीन काम केले, पण त्यात लोक सहभागी होते. त्याच्या गुणवत्तेवर लोकांची नजर होती. मोजमाप लोकांनी स्वतः केले. जलयुक्तमध्ये पैसा केंद्रस्थानी होता. वॉटर कपमध्ये श्रमशक्ती प्रमुख होती. "पहिलं पाऊल गावाचं, दुसरं पाऊल पानी फाउंडेशन-शासन-संस्था यांचे" हे लोकसहभागाचे गमक होते.

वॉटर कप सुरु झाल्यापासूनच जलसंधारणाची कामे केल्याने पाणी तर येईल पण पुढे काय? जास्त गावे कोरडवाहू म्हणजे पावसाच्या पाण्यावर अवलंबून होती. म्हणून मग पाणी आल्यावर चारा, दुभत्या जनावरांमध्ये वाढ, त्यातून सेंद्रिय शेतीकडे वाटचाल, दूध व्यवसाय – मत्स्यव्यवसाय - बकरी पालन यातून उत्पन्नात वाढ, फळबाग लागवडीमधून शेतीत बदल या दिशेने विचार सुरू आहे. अर्थात हे सर्व लोकांसोबत बसून, चर्चा करुन त्यांना वाटत असेल तरच मिळून करण्याचा विचार आहे. बघूया काय होतंय ते. स्वप्न आहे की काकडद-यासारखी गरीब गावेही म्हणू शकली पाहिजेत-

"आम्ही प्रकाशबीजे रूजवीत चाललो
वाटा नव्या युगाच्या रूळवीत चाललो !"



**मंदार देशपांडे, निर्माण ४**

mandar9999@gmail.com